# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## गुरूवार, दिनांक २० मार्च, २०२५/फाल्गुन २९, १९४६ शके

४०. शुक्रवार, दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी अशासकीय कामकाज (विधेयके) घेण्यात येणार आहेत. उक्त दिवशी अशासकीय कामकाजातील विचारार्थ एकूण ०४ अशासकीय विधेयके चर्चेकरिता घेण्यासाठी निश्चित करण्यात आले आहेत. अशासकीय विधेयकांना द्यावयाचा वेळ अशासकीय विधेयके व ठराव समितीने निश्चित करावयाचा असतो. तथापि, सध्या अशासकीय विधेयके व ठराव समिती नव्याने घटित करण्यात येत असल्याने मी शुक्रवार, दिनांक २१ मार्च,२०२५ रोजी अशासकीय कामकाजासाठी उपलब्ध असलेल्या १५० मिनिटांच्या वेळेपैकी १० मिनिटांचा वेळ पुर:स्थापनार्थ अशासकीय विधेयकांना व उर्वरित १४० मिनिटांचा वेळ चर्चेकरीता घेण्यात येणाऱ्या खालील नमूद अशासकीय विधेयकांना देत आहे.

| | | |
|---|---|---|
| (१) | **सन २०२५ चे विधानसभा विधेयक** क्रमांक ७ – महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक, २०२५ श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे | ३५ मिनिटांपेक्षा जास्त नाही |
| (२) | **सन २०२५ चे विधानसभा विधेयक** क्रमांक ४ – महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०२५ - सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे | ३५ मिनिटांपेक्षा जास्त नाही |
| (३) | **सन २०२५ चे विधानसभा विधेयक** क्रमांक ५ – कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ - श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.यांचे | ३५ मिनिटांपेक्षा जास्त नाही |
| (४) | **सन २०२५ चे विधानसभा विधेयक** क्रमांक ११ – मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ - श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे | ३५ मिनिटांपेक्षा जास्त नाही |

**वरीलपैकी कोणत्याही विधेयकाचा वेळ वाचल्यास तो त्या पुढील क्रमांकाच्या विधेयकाला देण्यात येईल.**

**विधान भवन,**      **जितेंद्र भोळे,**
**मुंबई,**      **सचिव (१) (कार्यभार)**
**दिनांक : २० मार्च, २०२५.**      **महाराष्ट्र विधानसभा.**

याची प्रत :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (Website)